# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १७/२०१२-१३ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. हरी भिमराव साळुंखे,<br>मु.पो. वायफळे, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. हरी भिमराव साळुंखे, मु.पो. वायफळे, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. २०.४.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार यांनी आपल्या घरासाठी घर क्र. २७३/२ साठी घरगुती वीज मंजुरी मिळावी यासाठी वि.प.कडे दि. २८.११.२०११ रोजी अर्ज केला. वितरण वाहिनीचा विस्तार असलेने या अर्जास एक महिन्यात चलन मिळणे आवश्यक होते ते चलन ग्राहकास दि. २८.३.२०१२ रोजी मिळाले. अर्जदार ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. १६.२.२०१२ रोजी तक्रार दाखल केली परंतु कक्षाने आजतागायत कुठलाही आदेश केला नाही. मंचाकडून अपेक्षित मदत - चलन मिळण्यास झालेल्या विलंबाबद्दल भरपाई मिळावी. अर्जासोबत कोटेशनची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २.५.२०१२ च्या लेखी अहवालात संख उप विभागात अपुरी कर्मचारी संख्या असल्यामुळे चलन देण्यास विलंब झाला आहे तरी नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुत तक्रारींची सुनावणी दि. ९.५.२०१२ ला मंचासमोर घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदार गैरहजर, प्रतिनिधी नेमले नाहीत. वि.प.तर्फे श्री. आर.बी. कदम, सहाय्यक अभियंता संख उप विभाग उपस्थित. त्यांनी मंचासमोर ग्राहकाने दि. २०.४.२०१२ रोजी चलनाची रक्कम भरली असून त्यांना दि. ३०.७.२०१२ पर्यंत वीज जोडणी देतो असे सांगितले. तसेच अर्जदार ग्राहकाचे भरपाई नको, तक्रार मागे घेत असल्याबद्दलचे अंडरटेकींग दि. २१.५.२०१२ पर्यंत मंचासमोर सादर करतो असे मंचासमोर सुनावणीचेवेळी सांगितले.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाची चलन देण्यास झालेल्या विलंबापोटी भरपाईची मागणी मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

## कारणमिमांसा

ग्राहकाने दि. २८.११.२०११ घरगुती वीज जोडणीसाठी वि.प.कडे अर्ज दाखल केला. वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने अर्जदार ग्राहकास १ महिन्यात दि. २७.१२.२०११ पर्यंत चलन देणे आवश्यक होते ते दि. २८.३.२०१२ ला देण्यात आले म्हणजेच जवळजवळ १२ आठवडे विलंब झाला आहे. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी संख उप विभागात अपुरी कर्मचारी संख्या असल्यामुळे चलन देण्यास विलंब झाला आहे तरी नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी मागणी केली आहे. वि.प.ने चलन देण्यास विलंब झाला, याबाबत दिलेले स्पष्टीकरण ग्राह्य धरता येणार नाही. श्री. कदम, सहाय्यक अभियंता यांनी तक्रारदाराचा भरपाई नको, तक्रार मागे घेत असल्याबद्दलचा लेखी अर्ज दि. २१.५.२०१२ पर्यंत दाखल करणार असल्याचे तसेच दि. ३०.७.२०१२ पर्यंत तक्रारदारास वीज जोडणी देणार असल्याचे सांगितले. ग्राहकास चलन देण्यास विलंब झाला असल्याने भरपाई देण्याची वि.प.ची जबाबदारी आहे व ग्राहकाचा तो हक्क आहे. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

# आदेश

१) अर्जदार ग्राहकाची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी संख उप विभाग यांनी ग्राहकास कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे दि. २८.३.२०१२ पर्यंत भरपाई द्यावी. सदर रकमेचे समायोजन दोन बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरित रक्कम रोखीने ग्राहकास द्यावी.

३) तक्रारदार ग्राहकाने भरपाई नको असा अर्ज दि. २१.५.२०१२ पर्यंत मंचास दिला तर भरपाईच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात येवू नये. वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी मंचासमोर कबूल केल्याप्रमाणे ग्राहकास दि. ३०.७.२०१२ पर्यंत वीज जोडणी द्यावी. त्याचा अहवाल मंचास द्यावा.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using SmartPDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFcreator.com

This document was created using Smart PDF Creator

To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com